# संस्थेच्या ट्रिटमेंटविषयी माहिती

**व्य**वहार **स**मजत **न**सतो.

आज व्यसनी माणसाकडे बघायचा समाजाचा दृष्टीकोन हा फारच चुकीचा आहे. व्यसनावर उपचार होऊ शकतात ही गोष्टच लोकांना पटत नाही. पण उपचार होऊ शकतात आणि ती माणसे परत समाजाच्या मुख्य प्रवाहात येतात या आमच्या अनुभवातूनच आम्ही मन:शक्ती व्यसनमुक्ती केंद्राची स्थापना केली.

व्यसनमुक्तीचा प्रचार, प्रसार व व्यसनी माणसावर उपचार हाच आमचा उद्देश्य आहे आणि गेल्या वर्षभराच्या काळात तो आम्ही चांगल्या प्रकारे साध्य करत आहोत. अनुभवातून शिकत आम्ही आमच्या केंद्राची उपचार पध्दती ठरवली आहे. पहिला भाग म्हणजे १० दिवसांचे उपचार, यात पहिल्यांदा शारिरीक उपचार शरीराचे झालेले नुकसान भरुन काढणे, दुसऱ्या भागात मानसिक उपचार व तिसऱ्या भागात स्थैर्य असा कार्यक्रम आखलेला आहे.

आमचे केंद्र अशा ठिकाणी आहे की, पर्यावरणाचा आमच्या उपचारांना चांगलाच फायदा होतो सकाळी सकाळी मोरांच्या आवाजाने जाग, डोंगराच्यामध्ये असल्यामुळे सूर्यकिरणे पोहोचायला आठ ते साडे आठ वाजतात. त्यामुळे सकाळ प्रसन्न, तिन्ही ऋतुंचा पूर्ण आस्वाद, पावसाळ्यात धो-धो पडणारा पाऊस, जोडीला असंख्य निर्झरांचा आनंद, वेगवेगळ्या पक्षांचे दर्शन हरिणांचा मुक्त विहार, अशा गोष्टी जरी कल्पनेतील वाटल्या तरी त्या मन:शक्ती व्यसनमुक्ती केंद्रात सहज साध्य आहेत. शहरीकरणामुळे होणारे प्रदूषण इथे अजिबात नाही उलट सिंहगडासह तिन्ही बाजूला असलेले उभे डोंगर तुमचे स्वागतच करतात. निसर्गाच्या सान्निध्यामुळे शरीर उपचारांना चांगला प्रतिसाद देते, मानसिकताही चांगली होते.

उपचारामध्ये मानसोपचारांबरोबरच योग, कसरत यांचा ही वापर केला जातो. नियमीत आहारामुळे शरीराची बिघडलेली घडी परत चांगली व्हायला सुरवात होते. शिवाय औषधोपचारांची जोड असतेच. स्वयंशिस्तीवर जोर दिल्यामुळे त्यांचा जगण्याचा स्तर ही उंचावण्यास मदत होते. हा भाग रिकव्हरीसाठी अतिशय महत्त्वाचा आहे.

व्यक्तीगत समुपदेशनाला सगळ्यात जास्त महत्त्व दिले जाते. वैयक्तिक पातळीवर आमच्याकडे असलेले अनुभवी समुपदेशक वेळोवेळी रुग्णांबरोबर बोलत असतात शिवाय सामुहिक समुपदेशन ही (ग्रुप थेरपी) असतेच व्यसन, त्याचे वाईट परिणाम, याच बरोबर चांगले जगण्यासाठी काय करावे लागते यावर सुध्दा समुपदेशनात मार्गदर्शन केले जाते. जशी व्यसनी माणसाला उपचारांची गरज असते तशीच त्याच्या कुटुंबियांनाही त्यांची गरज असते, त्यामुळे कौटुंबिक समुपदेशनावरही भर दिला जातो किंबहुना त्यालाही तेवढेच महत्त्व दिले जाते.

समाजात सर्वत्र पसरलेल्या व्यसनाच्या समस्येला तोंड देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या कार्यात जेवढे लोक येतील तेवढे कमीच आहेत. तेवढी ही समस्या गंभीर आहे. विचार करा तुमचे स्वागतच आहे. चला व्यसनामुळे पिडीत असलेल्या कुटुंबांना परत समजाच्या मुख्य प्रवाहात आणूया आम्ही वचनबध्द आहोत... तुम्ही...

## ठळक वैशिष्ट्ये

१. वैयक्तिक समुपदेशन

२. सामुहीक समुपदेशन

३. कौटुंबिक समुपदेशन

४. पुनर्वसनासाठी मार्गदर्शन व कृती

५. पुनर्वसनासाठी नवीन प्रकल्प

६. अत्यावश्यक रुग्ण सेवा

७. निर्विषीकरण कक्ष

८. स्पेशलाईज्ड डॉक्टर्स

९. स्पेशलाईज्ड क्लिनीकल सायकॉलॉजीस्ट

१०. होम व्हिजीटस्

११. पाठपुरावा

१२. विविध मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलशी संपर्क

१३. ॲम्ब्युलन्स सेवा



## नियमावली

- उपचार ९० दिवसांचे राहतील.
- पहिल्या ३० दिवसांमध्ये रुग्णाशी संपर्क साधता येणार नाही.
- संपर्क समुपदेशकांबरोबरच साधावा. वेळ १ ते ५
- सुगंधी द्रव्ये, मोबाईल, लॅपटॉप, रोख रक्कम व मौल्यवान वस्तू रुग्णाबरोबर ठेवता येणार नाहीत.
- तंबाखूजन्य पदार्थ रुग्णाला देऊ नयेत.
- कुठल्याही परिस्थितीत फी परत दिली जाणार नाही.
- प्रत्येक महिन्याची फी आगाऊ भरणे आवश्यक आहे.
- कोणत्याही रुग्णास इस्पितळात दाखल करावे लागल्यास त्याचा खर्च वेगळा द्यावा लागेल.
- महिन्यातून एकदा नातेवाईकांनी मनोविकार तज्ञांशी व समुपदेशकांची भेट घेणे आवश्यक आहे.
- ही उपचार पध्दती मुख्यत: मानसोपचारांची असल्यामुळे उपचारांच्या परिणामांमध्ये यश हे रुग्णांच्या मानसिक स्थितीवर अवलंबून राहील.
- रुग्णाच्या हातून काही तोडफोड किंवा नुकसान झाल्यास त्याची भरपाई नातेवाईकांना करावी लागेल.

## प्रार्थना

देवा,

जी परिस्थिती आम्ही बदलू शकत नाही,

ती स्वीकारण्यास मनाची **प्रसन्नता** आम्हाला दे,

जी परिस्थिती आम्ही बदलू शकतो,

ती बदलण्याचे **धैर्य** आम्हाला लाभू दे,

आणि अशा परिस्थितीतील भेद

जाणण्याचे **ज्ञान** आम्हाला दे...

# मन:शक्ती बहुउद्देशीय संस्था



## मन:शक्ती बहुउद्देशीय संस्था

संचालित

### व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र


सिंहगड पायथा, मु. गोळेवाडी,

पो. डोणजे, जि. पुणे ४११०२५

Ph.: +91 9657687287

+91 9049592763

+91 8605814474

www.mannshakti.org







## रुग्णाबरोबर द्यावयाचे सामान

- नेहमी वापरावयाचे कपडे - २ जोडी
- रात्री वापरण्यासाठी बरमुडा/ट्रॅक पॅन्ट, टी-शर्ट - २ जोडी
- अंडरवेअर, बनीयन, टॉवेल
- स्लीपर
- अंगाचा साबण, कपड्याचा साबण, टूथपेस्ट, टूथब्रश इ.